# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०५/२०२४ (मंगळवार) सकाळ


### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २०/०५/२०२४ रोजी २२/०० ते २२/४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ पोस्टे सावनेर परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक गोल्डन रंगाची मारूती सुझुकी SX4 कार क्र. एम. एच–०२/सीबी–७१०४ मध्ये मोहाफुल गावठी दारू आदमने कॉलेजच्या समोर वाहतुक करून घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या खबरे वरुन आदमने कॉलेजच्या बाजूला सावनेर पहलेपार येथे नाकाबंदी केली असता मारूती सुझुकी SX4 कार क्र. एम. एच–०२/सीबी–७१०४ चालक हा अंधाराचा फायदा घेवुन कार सोडुन पळुन गेला. घटनास्थळाहुन कारच्या मागच्या डीक्कीमध्ये ठेवलेले मोहाफूल गावठी दारूचे ४ रबरी टयुब मध्ये २४० लिटर दारू किंमती २४०००/– रू व मारोती सूझूकी कार क्र. MH 02 CB 7104 किंमती ५०,००००/– रू चा माल असा एकून ५२४००० रू /– मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ)(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार रविंद्र मानकर परी. पोउपनि अरुण राठोड, सफौ सुभाष राठोड, पोहवा संतोष बैरागी, पोशि भावेश शेंडे यांनी पार पाडली.



# पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील ब्राम्हणी परिसरात
# जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २०/०५/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील इंदीरा नगर ब्राम्हणी ता. कळमेश्वर वार्ड नं. १२ येथे खाली पटांगणात निंबाचे झाडाखाली काही इसम ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा अवैधरीत्या जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून सदर पथकाने कळमेश्वर हद्दीतील इंदीरा नगर ब्राम्हणी ता. कळमेश्वर वार्ड नं. १२ येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) गौरव बाळकुष्ण गमरे, वय २७ वर्ष रा. ब्राम्हणी २) पिंटुसिंग जोगिंदर बावरी रा. कळमेश्वर ३) भावनासिंग बावरी रा. कळमेश्वर ४) एम एच— ४०/ए ई ३४३४ चा अनोळखी चालक** हे पैशाचे हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) मोटारसायकल क्र. एम एच— ४०/ए ई— ३४३४ बजाज पल्सर २२० किंमती ४०,०००/— रू २) एम एच—४०/सी यु—९३६१ हिरो स्प्लेंडर किंमती ६०,०००/—रू. ३) मोटरसाइकल एम एच— ४०/बी एन ९०१२ किंमती २०,०००/— रू. ४) नगदी एकुण ७६०/—रू. ५) ५२ ताश पत्याची कॅट किंमती २०/रू असा एकुण १,२०,७८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. योगेश कामाले पोउपनि मनोज टिपले, सफौ मिश्रा, सफौ मन्नान, मनापोशि कुंदा, पोशि बाबुळकर, पोशि मनिश यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**